# मुंबई विद्यापीठ

क्र. मासविक/आयसीडी/२०२१-२२/५

## परिपत्रक

## (Levels of Restrictions for Breaking the chain)

संदर्भ : 1) Government of Maharashtra, Dept. of Revenue and forest, Disaster Management, Relief and Rehabitation, Management, Mantralaya, Mumbai- 400 032 Order No, DMU/2020/CR.92/DisM-1, Dated 4th June, 2021

2) विद्यापीठ परिपत्रक क्र.मासविक/आयसीडी/२०२१-२२/२८०, दिनांक ३१ मे, २०२१.

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यात उद्भवलेल्या कोरोना (COVID-१९) विषाणूच्या पार्श्वभूमीवर उपरोक्त संदर्भीय क्र. २ येथील परिपत्रकान्वये विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती दिनांक १ जून, २०२१ ते १५ जून, २०२१ पर्यंत विभागातील कर्मचारी संख्येच्या २५% प्रमाणे राहील असे कळविण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भीय क्र.१ येथील दिनांक ४ जून, २०२१ रोजीच्या शासन आदेशान्वये आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ व साथरोग कायदा, १८९७ कलम (२) अन्वये संपुर्ण राज्यामध्ये कोवीड १९ विषाणूच्या संसर्गाची साखळी खंडीत करण्यासाठी निर्बंधांच्या विविध पातळ्या निश्चित करण्यात आलेल्या आहेत. (Levels of Restrictions for Breaking the chain) त्यातील सूचनांनुसार विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती दिनांक २१ जून, २०२१ पासून पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत विभागातील कर्मचारी संख्येच्या ५०% प्रमाणे राहील. त्याप्रमाणे सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागाचे उपस्थिती विवरणपत्र कुलसचिवांना सादर करावे. तसेच अपवादात्मक परिस्थितीत कार्यालयीन आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांस कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य असेल.

सदर बाब सर्व संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

( डॉ. बळीराम गायकवाड )
प्रभारी कुलसचिव

मुंबई – ४०० ०३२
दिनांक – १८ जून, २०२१

**(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :**

१) विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसंचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

२) स्वीय सहायक : १) कुलगुरु २) प्र-कुलगुरु ३) कुलसचिव ४) वित्त व लेखा अधिकारी ५) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) सचिव, उमासा.

२) सचिव, मुंबई विद्यापीठ ऑफिसर्स वेल्फेअर असोशिएशन

३) सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ

४) सरचिटणीस, एज्युकेशनल एम्प्लॉईज वेल्फेअर असोशिएशन